# प्राचीन भारताचा इतिहास

## कला व सांस्कृतिक घटकांसह

समाधान महाजन
(सहायक राज्यकर आयुक्त)



**UPSC / MPSC**

सर्व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त

The UNIQUE academy

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 1. | अश्मयुग | 05 |
| 2. | हडप्पा संस्कृती | 11 |
| 3. | ताम्रपाषाण संस्कृती | 26 |
| 4. | वैदिक संस्कृती | 33 |
| 5. | उत्तर वैदिक काळ | 43 |
| 6. | जनपद, गणराज्ये व महाजनपदे | 46 |
| 7. | भारतीय तत्त्वज्ञान | 53 |
| 8. | जैन व बौद्ध धर्म | 56 |
| 9. | मौर्य साम्राज्य | 75 |
| 10. | मौर्योत्तर काळ – शुंग, सातवाहन व वाकाटक | 89 |
| 11. | मध्य आशियाई संबंध (युनान, शक, पर्शियन, कुषाण) | 100 |
| 12. | गुप्त साम्राज्य | 106 |
| 13. | चोल, पांड्य, चेर | 121 |
| 14. | हर्षवर्धन व त्याचा काळ | 128 |
| 15. | हर्षवर्धननंतरचा भारत (चालुक्य, पल्लव व चोल) | 133 |
| 16. | गुर्जर-प्रतिहार, पाल व राष्ट्रकूट | 141 |
| • | *कालानुक्रम* | *150* |
| • | *संदर्भ यादी* | *152* |

# 1 अश्मयुग

आपल्या पृथ्वीची उत्पत्ती 400 कोटी वर्षांपूर्वीची आहे. आतापर्यंत हे सिद्ध झाले आहे, की आफ्रिकेमध्ये सापडलेले सर्वांत प्राचीन मानवी जीवाश्म जवळपास 42 लाख वर्षांपूर्वीचे आहेत. मनुष्याचा विकास या 42 लाख वर्षांत झाला व तो आपल्या वर्तमान स्वरुपात 50 हजार वर्षांपूर्वी आला. या विविध कालावधींतील जीवाश्म अवशेष जगभर सापडले आहेत. **डायनासोर मात्र क्रिटेशियस कालावधीत नाहीसे झाले.**

आदिमानवाचे अवशेष भारतात आढळून आले नाहीत. पण या काळातील मानववंशी जीवाश्म भारतात नर्मदा नदी खोऱ्यातील 'हथनौरा' येथे मिळाले आहेत. अलीकडे महाराष्ट्रातील बोरी या ठिकाणी सापडलेल्या मानवनिर्मित वस्तूंवरून मानवाचे अस्तित्व 14 लाख वर्षांपूर्वीचे असावे, असे अभ्यासक म्हणतात. आफ्रिकेच्या तुलनेत भारतात मानवी वस्ती नंतर झाली असावी.

पुरापाषाण युगातील संस्कृतीचा विकास हिमानी कालखंडात झाला. मनुष्याने हत्यारे वापरण्याची सुरुवात करणे, ही एक मोठी घटना मानली जाते. हत्यारांचा नियमित वापर आफ्रिकेत 26 लाख वर्षांपूर्वी सुरू झाला होता. तरी भारतात सापडलेली दगडी हत्यारे मध्य प्लीस्टोसीन कालखंडापूर्वीची नसावीत.

## पाषाण युग

माणसाने वापरलेल्या दगडी अवजारांच्या स्वरूपावरून आणि हवामानात होणाऱ्या बदलांवरून पाषाण युगाचे तीन प्रकार पडतात : पुरा पाषाण युग, मध्य पाषाण युग व नव पाषाण युग.

**पाषाण युग**

1. **पुरा पाषाण युग** (Palneolithic Age) इ.स.पू. 25 लाख ते इ.स.पू. 10 हजार
2. **मध्य पाषाण युग** (Mesolithic Age) इ.स.पू. 10 हजार ते इ.स.पू. 4 हजार (काही ठिकाणी 12000 ते 10000)
3. **नव पाषाण युग** (Neolithic Age) इ.स.पू. 9 हजार ते इ.स.पू. 1 हजार

- **पूर्व पुरापाषाण** (Lower Palneolithic Age) - इ.स.पू. 25 लाख ते इ.स.पू. 9 लाख
- **मध्य पुरापाषाण** (Middle Palneolithic Age) - इ.स.पू. 10 लाख ते इ.स.पू. 40 लाख
- **उत्तर पुरापाषाण** (Upper Paleolnithic Age) - इ.स.पू. 40 लाख ते इ.स.पू. 10 लाख

## पुरापाषाण युग (Palneolithic Age)

### पूर्व/निम्न/प्रारंभिक पुरापाषाण युग (Lower Palneolithic Age)

- या कालखंडाचे वैशिष्ट्य म्हणजे हस्त-कुऱ्हाडी, खंडक (चोपर) व विदारणी (क्लीवर) यांचा वापर हत्यारे बनवण्यासाठी केला जात असे व त्यासाठी क्वार्टझाइट, बिल्लोर, चर्ट तसेच स्फटिक व बेसाल्टच्या दगडांचा वापर केला जात होता. दगडी हत्यारे प्रामुख्याने फोडणे, खणणे, तासणे यासाठी वापरली जात असत.

- **या संस्कृतीची ठिकाणे –** पहेलगाम (काश्मीर), अलाहाबाद (प्रयागराज) जिल्ह्यातील बेलणचे खोरे (उ.प्र.), भीमबेटका व आदमगड (मध्य प्रदेश), 16 आर व सिंघी तलाव (राजस्थान), नेवासा, कोरेगाव, चांदोली, शिकारपूर (महाराष्ट्र), हुसंगी (कर्नाटक), अट्टीरामपक्कम (तमिळनाडू).
- या कालखंडातील हवामान आर्द्रता कमी झाली होती.

**मध्य पुरापाषाण युग (Lower Palneolithic Age)**

- या युगातील हत्यारे दगडांचे पापुद्रे अथवा पातळ तुकडे यांवर आधारित होती. यात फलक, वेधणी, खुरचणी, तक्षणी यांचा समावेश होता. पहार व खुरपणी सारखी हत्यारे दगडांच्या पातळ तुकड्यांपासून बनवलेली होती.
- क्वार्टझाइट या दगडाऐवजी जैस्फर, चर्ट व फ्लिंट या दगडांचा वापर हत्यारे बनवण्यासाठी करण्यात येऊ लागला.
- **या संस्कृतीची ठिकाणे –** भीमबेटका, नेवासा, पुष्कर, रोहिरी पर्वतरांगा व नर्मदा किनाऱ्यावरील समनापूर.

**उत्तर पुरापाषाण (Upper Palneolithic Age)**

- या अवस्थेची दोन वैशिष्ट्ये होती :
  (अ) उद्योगात गारगोटीचा वापर.
  (ब) पृथ्वीवर होमोसेपियन मानवाची उत्पत्ती.
- या काळात हवेतील आर्द्रता कमी होती. उबदार हवामान असणाऱ्या हिमयुगाचा काळ व ही अवस्था एकाच कालखंडात होती.
- या काळात पाती (ब्लेड्स) व तक्षिणी (ब्युरिन्स) यांचा वापर होत असे. तसेच समांतर बाजू असणाऱ्या ब्लेड या तंत्राचा वापर केला गेला.
- या अवस्थेत मानव वापरत असलेल्या गुहांचे व पाषाणांचे आडोसे भीमबेटका येथे सापडले आहेत.

**मध्य पाषाण (मध्याश्म) युग (Mesolithic Age)**

हा पुरापाषाण व नवपाषाण युगांच्या मध्ये असलेला संक्रमण काळ होता. या काळात हवामान उबदार व कोरडे झाले. हवामान बदलामुळे वनस्पती व प्राणी यांत परिवर्तन घडून आले. त्यामुळे मानवाला नवीन प्रदेशात जाणे शक्य झाले. मध्य पाषाणयुगीन संस्कृती व प्रगत हडप्पा संस्कृती या समकालीन होत्या, असेही मानले जाते. बागोर (राजस्थान) व लंघनाज (गुजरात) या स्थळांवरून समजते की, हे मध्य पाषाणयुगीन समुदाय हडप्पा व इतर ताम्रपाषाण संस्कृतीच्या लोकांच्या संपर्कात होते. बागोरमध्ये तांब्यापासून बनवलेल्या बाणाची तीन टोके मिळाली आहेत, जी हडप्पा संस्कृतीप्रमाणे होती.

(1) **हत्यारे –** मध्याश्म युगातील अवजारांसाठी उपयोगात आणलेली पाती 'पन्हाळीदार गाभा' या तंत्राने गारगोटींच्या गोट्यांपासून अलग केलेली असत. ही पाती नखाएवढ्या किंवा त्याहून किंचित मोठ्या आकाराची असत. त्यामुळे त्यांना 'सूक्ष्मास्त्रे' असे म्हटले जाते. तसेच या युगाला 'सूक्ष्म पाषाण युग' असेही म्हटले जाते. ही पाती हाडे किंवा लाकडी दांड्याला खोबण करून किंवा त्यांच्या टोकावर घट्ट बसवून **मासेमारीचे गळ, भाले, बाण यांसारखी सुधारित शस्त्रे बनवणे यासाठी होई.** या काळात टोकाला छोटे पाते बसवलेले बाण उपयोगात आणले जात होते.

(2) **शेती व पशुपालन –** या काळातील मानवी समूह शिकारी, अन्नाचा संग्राहक व मासेमारी करणारा असला तरी या काळात तृणधान्य व फळे देखील उपलब्ध होती. त्यांच्या कापणीसाठी सूक्ष्म शस्त्रांचा उपयोग करून विळा आणि कोयत्यासारखी अवजारेही तयार केली जाऊ लागली. या काळात माणसाने अनेक वन्य वनस्पतींची लागवड करण्यास सुरुवात केली. वन्यप्राण्यांना पाळून माणसाळवले. सर्वांत

प्रथम कुत्रा या प्राण्याला माणसाळण्यात आले. जनसमूह एका जागी अधिक काळ स्थिरावू लागला. हळूहळू शेती व पशुपालनाचे तंत्र विकसित झाले.

(3) **मध्य पाषाणयुगीन संस्कृतीची ठिकाणे –** बागोर (राजस्थान), लंघनाज (गुजरात), सराय नाहर राय, चोपाणी मांडो, महदहा, दमदमा (उत्तर प्रदेश), भीमबेटका व आदमगड (मध्य प्रदेश), बागोर व आदमगड या ठिकाणी इ.स.पू. 6 हजार वर्षांपूर्वी मेंढ्या व बकऱ्यांचे पालन केले जात असल्याचे पुरावे मिळाले आहेत.

**प्रागैतिहासिककालीन कला**

- पुरापाषाण व मध्य पाषाणयुगीन लोक रंगकाम करत असत. त्यांनी काढलेली चित्रे विविध विषयांवर असत. यात पशू व मनुष्याची चित्रे प्रसिद्ध आहेत. शिकार करीत असल्याची चित्रे आहेत. पशूंचे चित्र काढत असताना गडद रेषांचा वापर केला जाई. तसेच त्यांच्या शरीरावर आडव्या रेषा असत. पशूंसोबतच पक्षी व माशांचीही चित्रे काढली जात.
- या दगडांवरील गुहेतील चित्र असलेला प्रदेश व्यापक आहे. पाकिस्तानच्या चारगुलपासून पूर्वेला ओडिशापर्यंत व उत्तरेला कुमाऊ पर्वतापासून दक्षिणेस केरळ राज्यापर्यंत पसरला आहे. महत्त्वपूर्ण ठिकाणे – मरहाणा पर्वत (उत्तर प्रदेश), भीमबेटका, आदमगड व लाखा जूआर (मध्य प्रदेश), कुपागल्लू (कर्नाटक).



*भीमबेटका येथील गुहांमधील चित्र.*

## नव पाषाण/नवाश्म युग (Neolithic Age)

या काळात मानव शेती व पशुपालन करू लागला. यामुळे मानवी जीवनशैलीत जो कमालीचा बदल नवाश्म युगामध्ये घडून आला, तो लक्षात घेता या स्थित्यंतरासाठी गोर्डेन चाइल्ड या ऑस्ट्रेलियन पुरातत्त्ववेत्त्याने 'नवाश्मयुगीन क्रांती' असा शब्दप्रयोग केला. भटके जीवन संपुष्टात येऊन स्थिर गाव-वसाहती निर्माण झाल्या. 10,000 ते 8,700 हा नवाश्म युगाचा कालखंड मानला जातो.

- **नवाश्म युगातील हत्यारे –** पूर्णतः नवीन प्रकारची दगडी हत्यारे व ते घडवण्याचे नवीन तंत्रज्ञान यांमुळे या काळाला 'नवाश्म युग' असे म्हणतात. या काळातील वैशिष्ट्यपूर्ण हत्यारे म्हणजे घासून गुळगुळीत केलेली कुऱ्हाडीची लांब – बुटक्या आकाराची पाती आणि दगडी कडी. या पात्यांना लाकडाचा दांडा बसवून त्यापासून हत्यारे बनवली जात. ज्याचा उपयोग झाडे तोडण्यासाठी व लाकडांना आकार देण्यासाठी केला जात असे. दगडी कुऱ्हाडीचा वापर ते करत.
- **शेतीची सुरुवात –** जेव्हा शेतीची सुरुवात झाली, तो काळ नवाश्म युगाच्या सुरुवातीला होता. बार्ली हे मुख्य पीक होते. त्यासोबतच गहू, जवस अशी पिकेही घेतली जात.
- **नवाश्म युगातील स्थिर वसाहती –** नव्या संशोधनानुसार, स्थिर जीवनाकडे स्थित्यंतर होत असताना सुरुवातीला एका जनसमूहात किमान 25 ते 40 लोक असणे आवश्यक होते. काही ठिकाणी तीच संख्या 50 ते 100 पर्यंत असायला हवी. या काळातील स्थिर गाव वसाहतींचे स्वरूप हे छोट्या वस्तीसारखे होते. कायमस्वरूपी घरे म्हणजे म्हणजे बहुतेकदा झोपड्या हे त्यांचे वैशिष्ट्य होते. अधिकारांच्या उतरंडीवर आधारित सामाजिक – कौटुंबिक रचनेची आणि वारसा कल्पनेची सुरुवात नवाश्म युगात झाली असे म्हणता येईल.
- **नवाश्म युगातील मातीची भांडी –** या युगाच्या दुसऱ्या टप्प्यांत मातीची भांडी घडविण्यास सुरुवात झाली असे सर्वसाधारणपणे दिसते. **घासून गुळगुळीत केलेल्या दगडी हत्यारांप्रमाणेच मातीची भांडी**




**घडविणे हे नवाश्म युगाचे मुख्य लक्षण समजले जाते.** ही मातीची भांडी अन्न शिजविण्यासाठी, अन्न वाटपासाठी आणि साठविण्यासाठी वापरली जात असत. सुरुवातीला ती हाताने तयार केली जात व नंतर चाकावर तयार करण्यास सुरुवात झाली. ही भांडी एकरंगी पृष्ठभाग घासून गुळगुळीत केलेली असत. त्यावर कोरीव काम करून किंवा ठसे उमटवून वा चिखलाच्या पट्ट्या चिकटवून नक्षी तयार केलेली असे. हळूहळू भांड्यावर रंगीत नक्षी काढायला सुरुवात झाली. अशा प्रकारे नवाश्म युगाच्या मध्यावर मातीची भांडी बनविणे ही एक उत्तम प्रतीची कला बनली होती.

- **नवाश्म युगातील हस्त व्यावसायिक व कारागीर –** या काळात मातीची भांडी बनविणारे कारागीर तसेच इतर हस्त व्यावसायिक व कारागीर लोकांचा वर्ग तयार झाला होता. विविध प्रकारच्या गारगोटींच्या खड्यांचे तसेच शंखांचे मणी बनवले जात. अर्धवट बनवलेले मणी, त्यासाठी वापरत असलेली हत्यारे नवाश्मयुगीन स्थळांमध्ये सापडतात.
- **नवाश्म युगातील व्यापार आणि दळणवळण** – नवाश्म युगाच्या दुसऱ्या टप्प्यावर प्राण्यांचा उपयोग सामानाची ने-आण करण्यासाठी होऊ

लागला. याच काळात चाकाचा वापर सुरू झाला. सुरुवातीची चाके लाकडाच्या अखंड ओंडक्यापासून बनवलेली असत. मातीची भांडीदेखील चाकावर घडवण्यास सुरुवात झाली होती.

- भारतातील 'कोल्डिहवा' (Koldihwa) येथे मिळालेल्या पुराव्यानुसार इ.स.पू. 7000 मध्ये तांदळाचे पीक घेतले जात असल्याचे कळते. पशूंना पाळण्याचा प्रकार वाढला. पशुपालन करणाऱ्या समुदायाचा जन्म झाला.
- हडप्पा संस्कृतीपूर्वी अस्तित्वात असलेल्या नवाश्मयुगीन गाव-वसाहतींची अनेक स्थळे उजेडात आली आहेत. त्यामुळे भारतीय उपखंडात इसवी सनापूर्वी ८००० च्या सुमारास स्थिर वसाहती अस्तित्वात आल्या होत्या, हे सिद्ध झाले. यातील काही वसाहतींचा विकास होऊन हडप्पा संस्कृतीचा उदय झाला असावा, हे बहुतेक अभ्यासक आता मान्य करतात.

### मेहेरगड (बलुचिस्तान)

*येथील उत्खननात भारतीय उपखंडातील नवाश्मयुगीन संस्कृतीच्या उदयापासून ते हडप्पा संस्कृतीच्या उदयापर्यंतचा सलग कालक्रम आणि त्या संस्कृतीचे भौतिक पुरावे उजेडात आले आहेत. येथे इ.स.पू. 7000 वर्षांपूर्वीपासून मनुष्य स्थायिक असल्याचे समजते.*

*जॉ फ्रंक्वा मॅरीज आणि रिचर्ड मेडो या पुरातत्त्वज्ञांनी मेहेरगड येथे उत्खनन केले. तिथे हडप्पा संस्कृतीच्या उदयाच्या खुणा दर्शविणाऱ्या ज्या नवाश्मयुगीन संस्कृतीचे अवशेष मिळाले, त्या संस्कृतीला 'टोगाओ संस्कृती' या नावाने ओळखले जाते.*

*मेहेरगड या ठिकाणी सुरूवातीला मातीच्या भांड्यांचा वापर केला जात नसे. या काळातील चौकोनी व आयताकृती घरे सापडली आहेत. जे गाऱ्याच्या कच्च्या विटांपासून बनवलेली असत. या घरात चार ते पाच खोल्या असत. या काळात ते शिकार व इतरत्र ठिकाणांहून गोळा करून आणलेल्या खाद्यान्नावर अवलंबून असत. काही प्रमाणात शेती व पशुपालन करत. येथील उत्खननात गहू व जव मिळाले आहेत. तसेच मेंढी, बकरी, हरीण, जंगली डुक्कर व गाय-बैल यांची हाडे देखील सापडली आहेत. कुबड असणारे पशूदेखील येथे पाळले जात. अशा अनेक कबर मिळाल्या आहेत, ज्यात मानवी प्रेतासोबत एका बकरीलाही गाडण्यात आलेले आढळून आले होते.*

*इ.स.पू. 6000 पासून हाताने बनवलेल्या मातीच्या भांड्यांचा वापर सुरू केला. त्यानंतर चाकावरील भांडे वापरात आली. हे लोक लाजवर्दी मणी व कार्नेलियन मण्यांचा वापर भांड्यावरील कलाकुसरींसाठी करीत.*

## भारतातील नवाश्मयुगीन स्थळे

### महाराष्ट्र

- महाराष्ट्रात मध्याश्मयुगीन माणूस इसवी सन 10000 ते 4000 या कालखंडात गुहांमध्ये राहत होता. पण महाराष्ट्रात पूर्णतः नवाश्मयुगीन स्वरूपाची स्थळे मिळाली नाहीत. महाराष्ट्रातील आद्य शेतकऱ्यांच्या गाव-वसाहती ताम्रपाषाणयुगीन होत्या. **इनामगाव (ता. शिरूर, जि. पुणे) हे ताम्रपाषाणयुगीन शेतकऱ्यांच्या गाव-वसाहतींचे अत्यंत महत्त्वाचे उदाहरण आहे.**

### जम्मू-काश्मीर

- काश्मीरमधील बुर्जहोम व गुफक्राल येथे इसवी सन पूर्व 2500 च्या सुमारास नवाश्मयुगीन गाव-वसाहतींची सुरुवात झाली. बुर्जहोम येथील लोक जमिनीत खड्डे करून राहत. उतरण्यासाठी शिडी (पायऱ्या) बनवलेली असे.  तसेच ते खडबडीत करड्या रंगाची मातीची भांडी वापरत. येथे पाळीव कुत्र्यांना त्यांच्या मालकांबरोबर जमिनीत पुरत असत. अशा प्रकारची नवाश्म प्रथा भारतात इतर कुठे नसावी.

### उत्तर प्रदेश

- उत्तर प्रदेशातील चोपणी मांडो, कोल्डिहवा आणि महागरा येथे इसवी सनापूर्वी 6000 च्या सुमारास नवाश्मयुगीन गाव-वसाहतींची सुरुवात झाली.
- महागरा येथे 'जव'च्या शेतीचे अवशेष सापडले आहेत. तसेच येथे पशूंचा गोठा देखील सापडला आहे. कोल्डिहवा येथे जगातील सर्वांत प्राचीन तांदळाची शेती केली जात असल्याचे पुरावे सापडले आहेत. (6500 इ.स.पू.).
- **लहुरादेवा** – उत्तर प्रदेशातील गंगा नदीच्या खोऱ्यात संत कबीरनगर जिल्ह्यात लहुरादेवा या नवाश्मयुगीन गाव-वसाहतीचे अवशेष सापडले. येथील शेतकरी भातशेती करत होते.

### बिहार

- बिहारमधील चिरांद, सेनुवार येथे इसवी सन पूर्व 2000 च्या सुमारास नवाश्मयुगीन गाव-वसाहतींची सुरुवात झाली.

### ईशान्य भारत

- आसाममधील दाओजाली हार्डिंग येथील उत्खननात ईशान्य भारतातील नवाश्मयुगातील अस्तित्वाचा पुरावा प्रथम उजेडात आला. तेथील गाव-वसाहतींची सुरुवात इसवी सनापूर्वी 2700 च्या सुमारास सुरू झाली. तेथील नवाश्मयुगीन हत्यारे चीनमधील नवाश्मयुगीन हत्यारांशी अधिक साम्य दर्शविणारी आहेत. गुवाहाटीजवळील 'सारुतारू' येथे कुऱ्हाडी व मातीची भांडी सापडली आहेत.

### दक्षिण भारत

- दक्षिणेत नवपाषाण काळ हा इ.स.पू. 2600 ते इ.स.पू. 800 इतका मानला जातो. त्याचे तीन टप्पे पडतात. पहिल्या टप्प्यात धातूची हत्यारे बिलकुल नव्हती. दुसऱ्या टप्प्यांत तांबे व कासे या धातूंची हत्यारे काही प्रमाणात वापरली जात. हात व चाक दोन्हीप्रकारे बनवलेली भांडी ते वापरत.
- राखेचे ढीग व वस्तूंच्या खुणा संगनकल्लू, ब्रह्मगिरी, पिकलीहाल, हल्लूर येथे आढळून आल्या आहेत.
- कर्नाटकातील संगनकल्लू, मस्की, ब्रह्मगिरी, टेक्कलकोटा, पिकलीहाल, हल्लूर, आंध्र प्रदेशातील नागार्जुनकोंडा, कोडेकल व पलावोय, तमिळनाडूमधील पय्यमपल्ली येथे इसवी सनापूर्वी सुमारे चौथ्या ते तिसऱ्या शतकात नवाश्मयुगाची सुरुवात झाली.



समाधान महाजन
(सहायक राज्यकर आयुक्त)

## लेखकाविषयी

| | | |
|---|---|---|
| नाव | : | **समाधान रघुनाथ महाजन** |
| मूळगाव | : | मु. पो. तरवाडे ता. जि. धुळे पिन - ४२४३११ |
| अनुभव | : | प्राथमिक शिक्षक (२००१ ते २००९)<br>जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,<br>सांगळेवाडी ता. जिंतूर जि. परभणी |
| निवड | : | १) मुख्याधिकारी (C.O.) (२००९)<br>२) सहायक आयुक्त विक्रीकर (२०१०)<br>३) IRPS (Gropup-A) (UPSC) 2011 |
| विशेष | : | १) आधुनिक भारताचा इतिहास - महाराष्ट्राचा विशेष संदर्भासह (युनिक अकॅडमी)<br>२) कविता संग्रह - 'अस्वस्थ क्षणांचे पाश' (शब्दालय प्रकाशन) |
| संपर्क | : | ७५८८९३१४६० |
| ई-मेल | : | srm.mahajan80@gmail.com<br>(आपल्या प्रतिक्रिया तसेच सुचनांचे स्वागत) |
| Facebook | : | samadhan mahajan आधुनिक भारताचा इतिहास - UPSC/MPSC |
| Telegram | : | https://t.me/historysamadhanmahajan |
| Youtube Channel | : | Samadhan Mahajan |



The UNIQUE academy

प्रकाशक -
**युनिक अॅकॅडमी पब्लिकेशन्स प्रा.लि.,**
१२०२/३९, वास्तू चेंबर्स, फर्ग्युसन कॉलेज मेनगेटसमोर,
शिरोळे रस्ता, पुणे ४११ ००४
फोन : ७७७५०८३३४४

Website : www.theuniqueacademy.com | E-mail : uniqueacademypublication@gmail.com